वर्ष : १३९

Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

# केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक १०४ • पृष्ठे : १० • चार रुपये • मंगळवार १६ एप्रिल २०१९, पुणे C (शहर आवृत्ती)

## विश्वचषकासाठी भारतीय संघ जाहीर

### विजय शंकर, दिनेश कार्तिकला संधी





**मुंबई :** इंग्लंड आणि वेल्स येथे होणाऱ्या आयसीसी विश्वचषकासाठी सोमवारी भारतीय संघ जाहीर करण्यात आला. भारतीय संघाचे नेतृत्व विराट कोहली करणार असून, उपकर्णधार रोहित शर्मा असेल. ३० मे पासून विश्वचषकाला सुरुवात होत आहे. विश्वचषकासाठी निवडण्यात आलेल्या अंतिम १५ जणांच्या संघात एम.एस. धोनीसह दिनेश कार्तिकला पर्यायी यष्टीरक्षक म्हणून संधी देण्यात आली आहे. विजय शंकरची लॉटरी लागली असून, शिखर धवन याचाही संघात समावेश करण्यात आला आहे. मात्र, ऋषभ पंतला संघात स्थान मिळाले नाही. केदार जाधव, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा यांना अष्टपैलू म्हणून संधी मिळाली आहे. फिरकी गोलंदाजांमध्ये कुलदीप यादव आणि युजवेंद्र चहल यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर वेगवान गोलंदाजांच्या फळीत जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी यांना संधी मिळाली आहे.

**असा आहे संघ :**
विराट कोहली (कर्णधार), रोहित शर्मा (उपकर्णधार ), शिखर धवन, के. एल. राहुल, दिनेश कार्तिक, केदार जाधव, एम. एस. धोनी, हार्दिक पंड्या, विजय शंकर, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी.

## शकील एहमद यांनी सोडला काँग्रेसचा हात

**पाटणा :** मधुबनी लोकसभा मतदारसंघातून तिकीट नाकारल्यानंतर काँग्रेसचे बिहारमधील ज्येष्ठ नेते शकील एहमद यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आहे. ते आज (मंगळवारी) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. शकील यांनी काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्ते पदाचा राजीनामाही दिला आहे. माजी केंद्रीय मंत्री असलेल्या शकील एहमद यांनी ट्विटरच्या माध्यमातून, मधुबनी मतदारसंघातून आजा आपण उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले. तसेच काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्ते पदाचा राजीनामा काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्याकडे पाठवला, असल्याचेही म्हटले आहे.

केसरी बालकुंज - पान १० वर

# आदित्यनाथ, मायावतींवर प्रचारबंदी

### आक्षेपार्ह वक्तव्यामुळे कारवाई




**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांच्यावर निवडणूक आयोगाने आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाईचा बडगा उगारला आहे. आयोगाने योगी आदित्यनाथ यांना ७२ तासांसाठी तर मायावती यांना ४८ तासांसाठी प्रचारबंदी घातली आहे. त्यामुळे योगी पुढचे तीन दिवस, तर मायावती दोन दिवस पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करू शकणार नाहीत. आज (मंगळवार) सकाळी सहापासून ही प्रचारबंदी अमलात येणार आहे.

प्रचारावेळी दोन्ही नेत्यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याची गंभीर दखल घेऊन आयोगाने ही कारवाई केली आहे. त्यांना कारवाईच्या काळात रोड शो किंवा मुलाखत देता येणार नाही.

सात एप्रिल रोजी सहारनपूर देवबंद येथे सप आणि बसपच्या संयुक्त सभेत केलेल्या वक्तव्या प्रकरणी मायावतींवर ४८ तास प्रचारबंदीची कारवाई करण्यात आली आहे. मायावती यांच्या भाषणाचा जो स्वर होता, त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडू शकतो, असे आयोगाचे मत आहे. आयोगाने मायावती यांना कारणे दाखवा नोटीस बजावून स्पष्टीकरण मागितले होते.

मेरठ येथील सभेत आदित्यनाथ यांनी केलेल्या अली आणि बजरंग बली वक्तव्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

## निवडणूक आयोगाची सर्वोच्च न्यायालयाकडून कानउघाडणी

**नवी दिल्ली :** निवडणूक प्रचारात जाती-धर्माच्या आधारे मते मागणाऱ्या नेत्यांवर कारवाई न केल्याने सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निवडणूक आयोगाला फैलावर घेतले. मायावतींनी धर्माच्या आधारे मतदान करण्याबाबत केलेल्या वक्तव्यावर नोटिशीला उत्तर दिले नाही, तुम्ही काय केले? असा सवाल न्यायालयाने विचारला. या प्रकरणी आज (मंगळवारी) होणाऱ्या सुनावणीला निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींनीही हजर राहावे, असे आदेशही न्यायालयाने दिले.

निवडणूक प्रचारादरम्यान धर्म आणि जातीच्या आधारे मते मागणाऱ्या नेत्यांवर आणि पक्षांवर कारवाई करण्याची मागणी करणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आला होता. त्यावर काल सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने सुनावणी करताना निवडणूक आयोगाला फटकारले.

धर्माच्या आधारे मते देण्याचे आवाहन केल्याने बजावलेल्या नोटिशीला मायावतींनी उत्तरही दिले नाही. तुम्ही काय केले? असा सवाल न्यायालयाने केला. त्यावर आमचे अधिकार मर्यादित आहेत, असे उत्तर आयोगाने दिले.

त्यावर या प्रकरणी न्यायालयात आज सुनावणी होणार आहे. त्यावेळी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनीही हजर राहावे, असे आदेश न्यायालयाने दिले.

Vencobb

एक्स् फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
१०५ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
१३३ रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनसह) दर*
१६५ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
४८ रु. प्रति डझन

## राहुल गांधी यांना नोटीस

**नवी दिल्ली :** 'चौकीदार चोर है' हे न्यायालयानेही मान्य केले आहे, असे वक्तव्य केल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांना नोटीस बजावली आहे. भाजप खासदार मीनाक्षी लेखी यांनी दाखल केलेल्या अवमानना अर्जावरून न्यायालयाने ही नोटीस बजावली. तसेच, राहुल यांना उत्तर देण्यासाठी २२ एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे. दरम्यान, राफेल खरेदी प्रकरणात नवी माहिती समोर आल्याने फेरसुनावणी घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. ती न्यायालयाने मान्य केली आहे.

## मेहबूबा मुफ्ती यांच्या ताफ्यावर दगडफेक

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांच्या ताफ्यावर दगडफेक करण्यात आल्याचे वृत्त आहे. सुदैवाने, यात कोणी जखमी झाला नाही; मात्र त्यांच्या तैनातीत असलेल्या सुरक्षा दलाच्या मोटारीचे काही नुकसान झाले. दगडफेक करणाऱ्यांची अद्याप ओळख पटलेली नाही.

## क्रूझची यशस्वी चाचणी

**भुवनेश्वर :** ओडिशाच्या किनारपट्टीवर भारताने सोमवारी स्वदेशी बनावटीच्या निर्भय क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. ही सहावी चाचणी होती. २०१३ मध्ये पहिल्यांदा निर्भय क्षेपणास्त्राची चाचणी घेतली होती. सुरुवातीच्या काही चाचण्या अयशस्वी ठरल्या होत्या.

## बसपच्या बँक खात्यात ६६९ कोटी

**नवी दिल्ली :** बहुजन समाज पक्ष बँक खात्यांमधील शिलकीच्या बाबतीत अव्वल ठरला आहे. बसपच्या सरकारी बँकांच्या शाखेमधील आठ वेग-वेगळ्या खात्यांमध्ये ६६९ कोटींच्या ठेवी आहेत तर, ९५.५४ लाखांची रोकड आहे. गेल्या २५ फेब्रुवारी रोजी बसपने निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या माहितीच्या आधारे हे समोर आले आहे. समाजवादी पक्ष शिलकीच्या बाबतीत दुसऱ्या स्थानी आहे. त्यांच्या विविध बँक खात्यांमध्ये ४७१ कोटी आहेत.

काँग्रेस १९६ कोटी, तेलगू देसमकडे १०७ कोटी तर भाजपकडे ८२ कोटी शिल्लक आहे.

## देशात यंदा ९६ टक्के पाऊस

### हवामान विभागाचा अंदाज



**पुणे :** उन्हाच्या तीव्रतेने हैराण झालेल्या सर्वांसाठी आनंदाची बातमी आहे. देशात यंदा ९६ टक्के पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे दुष्काळाशी दोन हात करीत असलेल्या शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, मान्सूनवर अल-निनोचा प्रभाव नसणार आहे. मात्र, त्यावर भारतीय हवामान विभागाची करडी नजर असेल, असेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांच्या (मॉन्सून) पावसावर एल-निनोचे सावट असल्याने यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज खासगी हवामान संस्था वर्तवित आहेत. मात्र, काही हवामान तज्ज्ञांच्या मते एल-निनोच्या स्थितीचा भारतीय मान्सूनवर परिणाम होणार नसून, यंदा चांगला पाऊस पडण्याचे संकेत आहेत. त्यामुळे दुष्काळाचे संकटही लवकरच दूर होणार आहे.

हवामान विभागाने काल यंदाच्या मान्सूनचा पहिला पूर्वानुमान जाहीर केले. त्यामध्ये देशात मान्सूनची वाटचाल समाधानकारक राहणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच, महाराष्ट्रात यंदा चांगला पाऊस बरसणार आहे. प्रशांत महासागरातील एल-निनो स्थितीचा मान्सूनच्या पावसावर परिमाण होतो. यंदा हा प्रभाव कमी राहणार आहे. मात्र, त्यावर हवामान विभागाची नजर राहणार आहे. हवामान विभागाने मागील वर्षी देशात ९७ टक्के म्हणजेच सरासरी इतक्या पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यानंतरच्या सुधारित अंदाजात सामान्य पावसाचे पूर्वानुमान दिले होते. मात्र, मागील वर्षी मान्सून हंगामात देशात ९१ टक्केच पाऊस पडला होता. कोकणात ९९ टक्के, मध्य महाराष्ट्रात ९१ टक्के, तर विदर्भ (९२ टक्के) या तीन विभागांत सरासरी इतका, तर मराठवाड्यात ७८ टक्के पाऊस झाल्याचे हवामान विभागाने जाहीर केले. मागील वर्षी पावसाने दमदार सुरुवात केली मात्र त्यानंतर पावसात मोठे खंड पडले होते, तर मान्सूनच्या शेवटच्या टप्प्यात परतीच्या पावसाने ओढ दिली. त्यामुळे सध्या राज्याला तीव्र दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

## भाजपचे डिजिटल गाव बनावट

### कथित लाभार्थी राज यांच्या सभेत



**सोलापूर :** मोदी सरकारने डिजिटल इंडियाच्या माध्यमातून हरिसाल हे गाव डिजिटल झाल्याचे दाखविले होते. या गावात ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून खरेदी व्यवहार केले जात असल्याचे व २४ तास वायफाय, एटीएम मशीन, मोबाईलचा वापर आदींवर फोकस करत गावातील एका तरुणाला जाहिरातीत दाखविले होते. या डिजिटल गावाचा खोटेपणा, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी उघडकीस आणला. या जाहिरातीमधील गोपालकृष्णाला चक्क व्यासपीठावर आणून हा तरुण नोकरीसाठी पुण्यात भटकंती करताना आढळला, असे राज म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष अमित शहा हे देशाला मोडीत काढत आहेत, असा आरोप करतानाच ज्यांच्यावर आपण विश्वास टाकला होता त्या मोदींनीच केसाने गळा कापला, अशी घणाघाती टीका करतानाच इतका निर्लज्ज पंतप्रधान पाहिला नाही, अशा शेलक्या शब्दात राज यांनी सोलापुरात आयोजित जाहीर सभेत मोदी सरकारचा पंचनामा केला.

राज यांनी आपल्या भाषणात मोदी आणि शहा यांना लक्ष्य केले. अच्छे दिन आणि विकासाच्या गप्पा मारणारे मोदी आणि शहा ही दोन नावे देशाच्या राजकीय क्षितिजावरून गेली पाहिजेत. या दोघांबद्दल आपल्या मनात प्रचंड राग असल्यानेच आपण आपल्या पक्षाचा एकही उमेदवार निवडणुकीत उभा नसताना प्रचारात उतरलो असल्याचे त्यांनी सांगितले. मोदी आणि शहा हे देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जात आहेत. त्यांनी शेतकरी आत्महत्या व बेरोजगारीचे आकडे लपविले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## दुसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा आज थंडावणार

**मुंबई, (प्रतिनिधी) :** लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुवारी राज्यातील दहा मतदारसंघात मतदान होणार असून, तेथील प्रचाराची रणधुमाळी मंगळवारी सायंकाळी समाप्त होईल. या दहा मतदारसंघांत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण (नांदेड), माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर (सोलापूर) आदी दिग्गजांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. महाराष्ट्रात लोकसभेसाठी चार टप्प्यांत मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यात विदर्भातील ७ मतदारसंघांत ११ एप्रिल रोजी मतदान झाल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात १८ एप्रिल रोजी बुलढाणा, अकोला, अमरावती, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, उस्मानाबाद, लातूर व सोलापूर अशा दहा लोकसभा मतदारसंघांत मतदान होणार आहे. नांदेडमध्ये काँग्रेसचे अशोक चव्हाण यांच्यासमोर भाजपचे प्रतापराव पाटील-चिखलीकर यांच्यात लढत होणार आहे. नांदेड हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो व २०१४ च्या निवडणुकीत मोदी लाटेतही अशोक चव्हाण यांनी हा गढ राखला होता. चव्हाण आता पुन्हा लोकसभेच्या रिंगणात उतरले असून, त्यांच्यासमोर शिवसेनेचे प्रतापराव चिखलीकर यांना भाजपने उमेदवारी दिली आहे.

दहा लोकसभा मतदारसंघांपैकी सोलापूरमधील तिहेरी लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापूरमध्ये काँग्रेसने सुशीलकुमार शिंदे यांना, भाजपने लिंगायत समाजाचे जयसिद्धेश्वर स्वामी यांना, तर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांना उमेदवारी दिली आहे. बीडमध्ये भाजपच्या प्रीतम मुंडे यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसने बजरंग सोनावणे यांना रिंगणात उतरवले आहे. सोनावणे यांच्यासाठी राष्ट्रवादीचे नेते व विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी आपली सगळी ताकद पणाला लावली आहे; तर प्रीतम मुंडे यांची ही निवडणूक त्यांच्या भगिनी महिला व बाल कल्याणमंत्री पंकजा मुंडे यांच्यासाठी प्रतिष्ठेची असल्याने त्या ही मतदारसंघात तळ ठोकून आहेत. ही लढत धनंजय मुंडे विरुद्ध पंकजा मुंडे यांच्यातील वर्चस्वाची लढाई झालीय.

हिंगोलीत शिवसेनेचे हेमंत पाटील व काँग्रेसचे अशोक वानखेडे यांच्यात अत्यंत चुरशीची लढत होत आहे. अमरावतीमध्ये शिवसेनेचे विद्यमान खासदार आनंदराव अडसूळ यांच्यासमोर काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नवनीत रवी राणा यांचे आव्हान असून, गुणवंत देवपारे (वंचित बहुजन आघाडी) व बसपचे अरुण वानखेडे हे किती मतं घेणार, यावर या निवडणुकीचा फैसला अवलंबून आहे.

## शरद पवारांकडून ही अपेक्षा नव्हती : उत्पल पर्रिकर

**पणजी :** माझ्या वडिलांबद्दल तुम्ही केलेले वक्तव्य बघून मला व माझ्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे, असे पत्र मनोहर पर्रिकर यांचे पुत्र उत्पल यांनी शरद पवार यांना लिहिले आहे. राजकीय फायद्यासाठी निधन झालेल्या माझ्या वडिलांचे नाव खोटेपणा करत वापरणे अत्यंत दुर्दैवी व असंवेदनशील असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. आज मनोहर पर्रिकर आपल्यात नाहीत. कदाचित म्हणूनच तुम्ही त्यांच्या नावाने खोटे बोलत आहात आणि राजकीय परिघातला हा नीचांक असल्याचेही उत्पल यांनी म्हटले आहे. ज्येष्ठ व आदरणीय राजकारणी असलेल्या पवार साहेबांकडून अशी अपेक्षा नव्हती, असे उद्विग्न झालेल्या उत्पल यांनी म्हटले आहे.

## राज ठाकरेंच्या सर्वच भाषणांवर निवडणूक आयोगाची नजर

**मुंबई, (प्रतिनिधी) :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या सध्या राज्यात होणाऱ्या सर्व सभांमधील भाषणांची निवडणूक अधिकाऱ्यांकडून तपासणी होणार आहे. त्यांच्याकडून प्रचारसभेत प्रत्यक्ष उमेदवाराचे नाव जरी घेण्यात येत नसले, तरी अप्रत्यक्षपणे कोणत्या उमेदवाराला त्याचा फायदा होतो, याची तपासणी होणार आहे. त्यानंतर या सभांचा खर्च आघाडीच्या खर्चात समाविष्ट करण्याच्या भाजपच्या मागणीबाबत निवडणूक अधिकारी निर्णय घेतील, अशी माहिती आयोगाकडून देण्यात आल्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सांगितले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या राज्यभर सभा घेत आहेत. भाजपच्या विरोधी या सभा असतात. राज ठाकरेंच्या सभांचा खर्च कोणत्या उमेदवाराच्या खर्चात धरायचा अशी विचारणा भाजपने निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे. त्यावर राज ठाकरेंची सर्व भाषणे निवडणूक अधिकारी तपासणार असल्याचे भाजपला सांगण्यात आल्याचे विनोद तावडे यांनी सांगितले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांच्या पायाखालची जमीन सध्या सरकली आहे. त्यामुळे ते आता सरकार आणि काँग्रेसमधील त्यांचे सहकारी त्यांना चक्रव्यूहात अडकवून संपविण्याचा प्रयत्न करत असल्याचे नांदेडमध्ये सांगत फिरत आहेत. मतदारांना भावनिक आवाहन करण्याचा हा त्यांचा प्रयत्न असला, तरी नांदेडकर मतदार आता त्यांना भुलणार नाहीत, असेही तावडे म्हणाले. माजी संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांचे निधन झाल्यानंतर शरद पवार यांनी त्यांच्याबद्दल काही वक्तव्य करणे योग्य नाही. हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला धरून नसल्याचेही, तावडे म्हणाले.

**त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे काय?**
अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचा आरोप करून ऊर्मिला मातोंडकर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मात्र, आज बोरिवलीत मोदींच्या नावाच्या घोषणा दिल्याने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांना मारहाण केली. त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही का, असा सवाल तावडे यांनी केला.

Tilak Maharashtra Vidyapeeth,Pune.
Accredited by NAAC with 'B++' Grade
Towards a rich legacy of 100 years...



Department of Journalism& Mass Communication
ADMISSIONS OPEN FOR 2019-20
B.A.J.M.C.
Eligibility :- 12th Passed In any Stream
M.A.M.C.
Eligibility :- Graduated In any Stream
For Entrance Exam Date Visit: www.tmv.edu.in
Contact Details:
Tilak Maharashtra Vidyapeeth, Mukund Nagar, Gultekdi, Pune-37 Phone: 9112249372, 02024403079, massmedia@tmv.edu.in
www.tmv.edu.in